**ठळक बातम्या**

- अर्ज जमा न करणाऱ्या राज्यातल्या २ कोटींहून अधिक मतदारांची नावं प्रारुप यादीतून वगळली जाणार

- कर्मचारी भरती आयोगाची संयुक्त पदवी परीक्षा रद्द करण्याचा झारखंड सरकारचा निर्णय, आंदोलकांकडून उपोषण मागे

- मध्यप्रदेशात मध्यरात्री झालेल्या अपघातात ८ मजुरांचा मृत्यू, ३२ जण जखमी

- भारतातल्या फोटो ओळखपत्र आधारित मतदार यादीचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून कौतुक

आणि

- विदीत गुजराथी, दिव्या देशमुखसह १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर

<><><><><>

SIR अर्थात विशेष मतदार यादी पुनरीक्षणाच्या अंतर्गत राज्यातल्या २ कोटींहून अधिक मतदारांनी अर्ज जमा केलेलेच नाही. त्यामुळं प्रारुप मतदार यादीतून त्यांनी नाव हटवली जाणार आहेत.

SIR च्या अंतर्गत अर्ज जमा करण्याचा काल अखेरचा दिवस होता. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार राज्यात ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार आहेत. त्यापैकी २ कोटी ७ लाख ३ हजार २६८ मतदारांनी SIR च्या अंतर्गत आवश्यक असलेले अर्ज BLO कडे जमा केले नाही. एकूण मतदारांच्या तुलनेत ही संख्या २१ टक्क्यांहून अधिक आहे. ठाण्यातल्या सर्वाधिक ३८ टक्के मतदारांनी हे अर्ज जमा केले नाहीत. मुंबई शहरातल्या ३७ तर मुंबई उपनगरातल्या ३४ टक्के नागरिकांनी बीएलओकडे अर्ज दिले नाही. पुणे आणि नागपूरमध्ये हे प्रमाण ३१ टक्क्यांहून अधिक आहे. हिंगोली, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये सर्वात कमी म्हणजे सुमारे ९ टक्के मतदारांनी अर्ज भरून दिले नाहीत.

SIR अर्थात मतदार यादी विशेष पुनरीक्षण प्रक्रियेतून सुटलेल्या मतदारांना नंतरही मतदारयादीत नाव समाविष्ट करता येईल असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. २४

ऑगस्टला प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध होईल. या प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांना नमुना ६, घोषणापत्र आणि आवश्यक कागदपत्र जमा करुन मतदार यादीत नाव समाविष्ट करता येईल. त्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होेणाऱ्या अंतिम मतदार यादीत या मतदारांचे नाव समाविष्ट होऊ शकेल. अंतिम मतदार यादीतही नाव नसलेल्या मतदारांना त्यानंतर सुद्धा मतदार यादीत नाव नोंदवता येईल, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

झारखंड कर्मचारी निवड आयोगाकडून घेतली जाणारी संयुक्त पदवी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय झारखंड सरकारनं घेतला आहे. TDPL या खासगी संस्थेमार्फत घेतल्या जाणाऱ्या इतर सर्व परीक्षाही सरकारनं रद्द केल्या आहेत. गेल्या २४ दिवसांपासून सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मंत्रीमंडळाच्या विशेष बैठकीनंतर सरकारनं काल रात्री हा निर्णय जाहीर केला. याशिवाय २०१४ पासून झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगाकडून घेण्यात आलेल्या परीक्षांची चौकशी सरकार करणार आहे. या निर्णयांचं विद्यार्थ्यांनी स्वागत केलं आहे. देवेंद्रनाथ महातो आणि इतर आंदोलननकर्त्यांनी सरकारच्या या निर्णयानंतर उपोषण मागे घेतलं आहे. या सर्व परीक्षांची सीबीआय चौकशी होईपर्यंत आंदोलन सुरू राहील असं विद्यार्थी नेत्यांनी स्पष्ट केलं आहे. दरम्यान, या परीक्षांमधून निवड होऊन नोकरी लागलेल्या उमेदवारांनी त्यांच्या भविष्याविषयी चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><>**

कर्नाटक लोकसेवा आयोगाच्या प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणाशी संबधित विविध ठिकाणांवर अंमलबजावणी संचालनालयाने छापे टाकले. यापूर्वी कर्नाटक लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष शिवशंकरप्पा एस. साहुकर यांच्यावर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या भरतीसाठी प्रश्नपत्रिका फोडणे, ओएमआर शीटसमध्ये फेरफार आणि सरकारी नोकरीसाठी उमेदवारांकडून ७० ते ८० लाख रूपयांची लाच मागितल्याचे आरोप लावण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर ईडीने शिवशंकरप्पा आणि कर्नाटक लोकसेवा आयोगाच्या काही सदस्यांची निवासस्थाने तसंच संबधित खाजगी कंपन्यामध्ये छापे टाकले.

**<><><><>**

मजुरांना घेऊन जाणारे पिकअप वाहन डंपरला धडकून झालेल्या अपघातात ८ जण ठार तर ३२ जण जखमी झाले आहेत. हा अपघात काल मध्यरात्री एकच्या सुमारास मध्य प्रदेशातल्या भिंड-ग्वाल्हेर राष्ट्रीय महामार्गावरील छिमका गावाजवळ झाला. मृतांमधील सर्वजण उत्तर प्रदेशाच्या लखीमपूर खेरी इथले असून, ते भात लागवडीचं काम पूर्ण करून परत येत होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी काल उत्तर प्रदेश, पंजाब आणि गुजरातसाठी नवीन प्रदेश प्रभारी नियुक्त केले. विनोद तावडे यांच्याकडे उत्तर प्रदेशचे प्रभारी म्हणून जबाबदारी दिली आहे. तर जगदीश पटेल यांची सह प्रभारी म्हणून नियुक्ती झाली आहे. पंजाबच्या प्रभारीपदी डॉ. सतीश पुनिया यांची तर गुजरातचे प्रभारी म्हणून तरुण चुघ यांची नियुक्ती झाली आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं १२ वी ब्रिक्स पर्यावरण मंत्र्यांची बैठक सुरू असून त्यात सदस्य देशांचे मंत्री, वरीष्ठ अधिकारी, धोरणकर्ते आणि पर्यावरण तज्ज्ञ सहभागी झाले आहेत. या बैठकीत पर्यावरणाशी संबंधित विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा, सहमती निर्माण करणं, तसंय पर्यावरणीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी भर देण्यात येत आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव बैठकीच्या अध्यक्ष स्थानी आहेत. 'लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेसाठी उभारणी' अशी या बैठकीची मध्यवर्ती संकल्पना आहे.

दरम्यान, पर्यावरणीय कार्यगटासाठी अधिक भरीव सहकार्य करण्यासाठी आणि सकारात्मक परिणामांसाठी सक्रीय सहभागासाठी आपण इच्छुक असल्याचं केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय निवडणूक आयोगानं दिलेल्या मतदार ओळखपत्र प्रणालीचं कौतुक केलं आहे. इतकेच नाही तर अमेरिकेतील निवडणूक नियम अधिक कडक करण्यासाठी ही आदर्श प्रणाली असल्याचे म्हटले आहे.

ट्रम्प यांनी भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत, समाज माध्यमावर एक पोस्ट लिहिली आहे. त्यात वैध फोटो ओळखपत्राशिवाय अमेरिकेत निवडणुका कशा घेतल्या जातात, असा प्रश्न कुमार यांनी उपस्थित केल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. तसंच अमेरिकन काँग्रेसने ‘सेफगार्ड अमेरिकन व्होटर एलिजिबिलिटी-सेव्ह अमेरिका ॲक्ट’मंजूर करण्याची पुन्हा मागणी केली. भारतात नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ६४ कोटी २० लाखांहून अधिक नागरिकांनी मतदान केल्याचा उल्लेखही ट्रम्प यांनी पोस्टमध्ये केला आहे. भारत आणि ब्राझील मध्ये मतदार ओळख प्रणाली अधिक मजबूत असून अमेरिकन निवडणूक व्यवस्थेतही अशाच प्रकारच्या उपाययोजनांची गरज त्यांनी पुन्हा व्यक्त केली.

<><><><><>

गाझामधल्या प्रस्तावित शस्त्रसंधीच्या प्रस्तावावर चांगली प्रगती झाल्याचा दावा अमेरिकेनं केला आहे. इस्राइलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानू यांच्यासोबत ४ तास चर्चा झाल्याचं अमेरिकेचे विशेष दूत जेरेड कुशनर म्हणाले. गाझाची पुर्नबांधणी, सैन्य हटवणे आणि इस्त्रालच्या सुरक्षेच्या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या डावात भारतीय संघाच्या फलंदाजांची खराब सुरुवात झाली. भारताचा निम्मा संघ तंबूत परतला असून एकाही खेळाडूला अर्धशतक देखील झळकवता आलेलं नाही. पहिल्या डावात दीड शतक झळकवणारा देवदत्त पड्डीकल ४४ धावांवर बाद झाला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ५ बाद १३९ धावा झाल्या होत्या आणि भारताकडे ३१७ धावांची आघाडी आहे. पहिल्या डावात भारतीय संघानं ४६२ धावा केल्या होत्या. पण श्रीलंकेचा संघ पहिल्या डावात २८४ धावांवर बाद झाला. मानव सुतारनं ४ आणि रविंद्र जाडेजानं ३ गडी टिपले.

<><><><><>

केंद्र सरकारनं ग्रँडमास्टर विदित गुजराथी आणि दिव्या देशमुख यांच्यासह एकूण १७ खेळाडूंना आज अर्जुन २०२५ चे पुरस्कार जाहीर केले. अर्जुन पुरस्कार मिळालेल्या खेळाडूंमध्ये ॲथलेटिक्स खेळाडू तेजस्विन शंकर, मोहम्मद अजमल व्ही. आणि प्रियांका

गोस्वामी, बॅडमिंटनपटू  ट्रीसा जॉली, पुल्लेला गायत्री गोपीचंद, मुष्टीयोद्धा नरेंद्र, दिव्यांग नेमबाज  धनुष श्रीकांत यांनाही अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे.

फुटबॉल क्षेत्रात भरीव योगदानासाठी आय. अरुमैनायगम यांना अर्जुन जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.  द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक नेहा चव्हाण यांना जाहीर झाला आहे.

क्रीडा क्षेत्राच्या प्रोत्साहन आणि विकासात उल्लेखनीय भूमिका बजावणाऱ्या संस्था आणि संघटनांना दिला जाणारा राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार २०२५ पुण्याच्या आर्मी पॅरालिम्पिक नोड संस्थेला जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणी नवी दिल्लीत आंदोलनावर झालेल्या पोलीस कारवाई प्रकरणाची चौकशी करायला उच्च स्तरीय समितीची घोषणा सर्वोच्च न्यायालयानं केली आहे. महिला आंदोलकांवर झालेल्या कारवाईची चौकशीही ही समिती करेल. संसदेवर झालेल्या मोर्चाचं व्हिडीओ चित्रण या समितीकडे द्यायचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत.

**//<><><><><>//**